**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

**प्रेस नोट दि.०५/०७/२०१८**

**दि.०४/०७/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वाकड पो स्टे ५५०/१८,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,११९/१७७ |
| **फिर्यादी** | सुरज सुतार,पो.शि. वाकड पोलीस स्टेशन पुणे शहर |
| **आरोपी** | अंकित रविंद्रकुमार लुनीया,वय-३१ वर्ष,रा. पार्क स्टिट सोसा.वाकड,पुणे (जखमी) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०७/२०१८ रोजी १२/३० वा. शिवाजी चौक वेणुनगर,वाकड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कार ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी त्याची कार ही वाकड पुलाचे भिंतीचे कठडयास स्वतः धडक देवुन,अपघात करून,त्यामध्ये स्वतः जखमी होण्यास त्याचे कार मध्ये शेजारी बसलेला त्यांचा नातेवाईक प्रदिप छत्तसिंग बोथरा,वय-५२,रा.पार्क स्टिट सोसा. वाकड,पुणे यांस गंभीर जखमी करून,त्यांचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. व्ही.जी.बिराजदार ९६८९११०१२० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हिंजवडी पो स्टे ३३५/१८,भादविक ३०४(अ) |
| **फिर्यादी** | विजय राठोडे,पो.ना. हिंजवडी पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | १.इन्फोटेक रिसायकलिंग प्रा.लिमी. कंपनीचे लेबर ठेकेदार २.ब्रेकर चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०७/२०१८ रोजी पहाटे ०२/०० वा. कॉड्रन कंपनी हिंजवडी फेज-२,पुणे येथील सिरनजी कंपनीचे दुस-या मजल्यावर हिंजवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम इन्फोटेक रिसायकलिंग प्रा.लिमी. कंपनीचे लेबर ठेकेदार व ब्रेकर चालक यांनी त्यांचे पुणे येथील सिरनजी कंपनीचे दुस-या मजल्यावरील आतील भिंती ब्रेकरचे सहायाने पाडण्याचे काम मजुर कामगारांकडुन काम करवुन घेत असताना,कामगारांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन त्यांना हेल्मेट,सुरक्षित जाळी, सेफ्टी बेल्ट इत्यादी योग्य ती साधनसामुग्री पुरविणे आवश्यक असताना, त्यांना तशी कोणतीही सुरक्षित साधने न पुरविता,तसेच सदर ठिकाणी उजेडाची सोय न करता,त्याठिकाणी पडलेला राडा-रोडा, लोखंडी साहित्य व इतर साहित्य साफ न करता हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्या मुळे,सदर कंपनीची भिंत ढासळुन ती खाली काम करणारा कामगार अनारूल अल्लाऊद्दीन एसके हक,वय-३७,रा.गंगारामवाडी,हिंजवडी,पुणे याचे अंगावर पडुन त्यामध्ये तो गंभीर जखमी होवुन मयत झाला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ए.एम.पगारे ९०११०००३५५ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे १७५/१८,भादविक ३७९,३४ |
| **फिर्यादी** | सतिश नेहे,वय-३७ वर्ष,रा.कात्रज कोंढवा रोड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात तीन इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०१/०७/२०१८ रोजी सकाळी १०/२८ ते १०/५५ वा. चे दरम्यान रांका अपार्टमेंट,सुखसागर टेरेस साधु वासवाणी रोड,जीपीओ,पुणे येथे |
| **तपशिल** | कोणीतरी अज्ञात तीन इसमांनी रांका अपार्टमेंट सुखसागर टेरेस,साधु वासवाणी रोड, जीपीओ,पुणे याठिकाणी लावण्यात आलेल्या मोबाईल टॉवरच्या बॅट-या एकुण ४८ नग १,२०,०००/- रू किमतीच्या बॅट-या चोरुन नेल्या आहेत. (फिर्यादी यांनी सीसीटिव्ही फुटेज पाहुन खात्री करुन आजरोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. पठाण |

**जनसंपर्क अधिकारी,**

**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**